# ‘शुद्धीचा फेटिशिझम’ - एक सार्थ संकल्पना?



अनंत फडके

‘फुलेवादी परंपरा आणि समाजक्रांतीचा पेच’ हा उमेश बगाडे यांचा दीर्घ लेख ‘वाटसरू’मध्ये जानेवारी २०१७ मध्ये दोन भागात आला आहे. हा लेख म्हणजे कॉ. प्रभाकर वैद्य यांच्या म. फुले यांच्यावरील पुस्तकाच्या पुनर्मुद्रित आवृत्तीला कॉ. उमेश बगाडे यांनी लिहिलेली प्रस्तावना आहे. या लेखात त्यांनी एका प्रश्नाबद्दल एक नवी मांडणी केली आहे. माझी ही टिपणी या त्यांच्या नव्या मांडणीबद्दल आहे.

बगाडे यांनी म्हटल्याप्रमाणे जात व वर्गाचा हा गुंता समजून घेण्यासाठी आणि विशेषत: जात व वर्गाच्या परस्परछेदक व परस्परपूरक गतिशीलतेचा उलगडा करण्यासाठी लिहिलेल्या या टिपणात ‘कमोडिटी फेटिशिझम’ या मार्क्सच्या संकल्पनेचा व ‘शुद्धीचा फेटिशिझम’ या एका नव्या संकल्पनेचा वापर त्यांनी केला आहे. हा प्रयत्न व त्याचे फलित याबद्दल माझ्या मनात काही प्रश्न आहेत.

भांडवली समाजात ‘कमॉडिटी फेटिशिझम’ कार्यरत असतो तर भारतातील सरंजामी मध्ययुगामध्ये ‘शुद्धी-अशुद्धीचा फेटिशिझम’ प्रभुत्वात होता असे बगाडेंचे म्हणणे आहे. त्याची चिकित्सा करण्याआधी मुळात ‘कमॉडिटी फेटिशिझम’’ (क्रयवस्तूभ्रम) बाबतची मार्क्सची मांडणी काय होती ते पहायला हवे. मार्क्सने मांडले की श्रमशक्तीसकट सर्व वस्तू या क्रयवस्तू बनणे व त्यांना मूल्य प्राप्त होणे हे भांडवलशाहीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्यामुळे वस्तूंची देवाणघेवाण बाजारपेठेमार्फतच होते. या बाजारपेठी विनिमयाचा हेतू या वस्तू उपयोगासाठी, मानवी गरजा भागवण्यासाठी हासील करणे असा नसतो तर त्या त्या वस्तूचे मूल्य पैशाच्या रूपात मिळवणे हा हेतू असतो. त्यामुळे या क्रयवस्तूंचा बाजारपेठेत विनिमय होतांना हे मूल्य ज्यामुळे बनते ते ‘अमूर्त मानवी श्रम’ फक्त लक्षात घेतले जातात. या बाजारपेठी विनिमयात क्रयवस्तूंचे

ईमेल : anant.phadke@gmail.com

उपयोगमूल्य व म्हणून ही उपयोगिता निर्माण करवणारे मूर्त श्रम दुर्लक्षिले जातात, मागे पडतात. (क्रयवस्तूची मूर्तता संपुष्टात येते असे बगाडेंनी म्हटले आहे ते बरोबर नाही) एवढेच नव्हे तर माणसामाणसांमध्ये विनिमय होतो आहे असे या विनिमयाचे रूप न राहता जणू या दोन क्रयवस्तूंमध्ये विनिमय होतो आहे असे चित्र उभे राहते. म्हणजेच माणसा-माणसांमधील उत्पादन-संबंध हे वस्तूंमधील संबंधांचे रूप घेतात व मूल्य, अमूर्त श्रम हा या क्रयवस्तूंचा गुणधर्म बनतो. म्हणजे निर्जीव अशा या वस्तूंना मानवी गुण अद्‌भुतरीत्या प्राप्त होतात. याला मार्क्स 'कमोडिटी फेटिशिझम' (क्रयवस्तूभ्रम) असे म्हणतो. एका वाक्यात सांगायचे तर निर्जीव अशा क्रयवस्तूला मानवी, सजीव गुण प्राप्त होणे म्हणजे 'कमॉडिटी फेटिशिझम' (क्रयवस्तूभ्रम).

मानवी संबंधांचे हे उफराटे रूप म्हणजे माणसा-माणसांमधील संबंधांबाबत लोकांनी बाळगलेल्या चुकीच्या कल्पना असे नसते. तर बाजारपेठी व्यवहार करायचा म्हटले की अटळपणे मानवी संबंध उफराटे रूप घेतात व त्यामुळे क्रयवस्तूभ्रम तयार होतो. माणसामाणसातील उत्पादनसंबंधांना बाजारपेठी व्यवहारातून येणारे हे उफराटे रूप पैसानामक खास क्रयवस्तूच्या बाबतीत जास्त स्पष्टपणे पुढे येते. व्यापारी क्रयवस्तू विकतो तेव्हा या व्यवहाराचे ध्येय मानवी गरजा पूर्ण करण्याचे नसते तर नोटानामक कागदाचे अधिक तुकडे मिळवण्याचे असते. सर्व व्यवहार या नोटांभोवती फिरतो. या कागदी तुकड्यांना अद्‌भुत सामर्थ्य प्राप्त होते, गुण प्राप्त होतात.

एखाद्या प्रतिमात्मक वस्तूमध्ये दैवी शक्ती आहे असे टोळीप्रधान समाजात मानले जायचे. टोळीप्रधान समाजाची ही 'वेडगळ' समज मार्क्सच्या काळात भांडवली बुद्धिजीवी लोकांमध्ये टीकेचा, थट्टेचा विषय होता. पण म्हणून मार्क्सने याकडे लक्ष वेधले की या 'प्रगत', आधुनिक भांडवली जगातही वेगळ्या प्रकारचा पण फेटिशिझमच आहे! या आधुनिक जगातील बाजारपेठी व्यवहारातून निर्जीव अशा क्रयवस्तूला मानवी, सजीव गुण प्राप्त होतात; त्यामुळे मार्क्सने मुद्दाम 'कमॉडिटी फेटिशिझम'' (क्रयवस्तूभ्रम) असे नाव या प्रक्रियेला दिले.

भांडवली पिळवणूक या क्रयवस्तू-भ्रमामुळे झाकली जाते. मानवी श्रमाची उत्पादकता हा गुण निर्जीव अशा यंत्राला, भांडवलनामक कागदाच्या तुकड्याला प्राप्त होतो. मानवी श्रमातून वरकड, नफा तयार होतो हे त्यामुळे झाकले जाऊन यंत्रामुळे, भांडवलामुळे नफा तयार होतो कारण यंत्राला, भांडवलाला उत्पादकता असते असे भ्रामक चित्र तयार होते. असा भ्रम तयार होतो की भांडवलाला (जी खरी निर्जीव गोष्ट असते) उत्पादकता असते व त्यामुळे कामगाराला जसा त्याचा वाटा म्हणजे मजुरी मिळायला हवी तशी भांडवलाला त्याचा वाटा म्हणजे म्हणजे नफा मिळाला पाहिजे.

'कमॉडिटी फेटिशिझम' (क्रयवस्तूभ्रम) या प्रक्रियेचा दुसरा पैलू म्हणजे मानवी उत्पादनसंबंधांचे वस्तूकरण. (एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत.) माणसा-माणसांमधील उत्पादनसंबंध हे बाजारपेठी व्यवहारामध्ये जसे आहेत तसे दिसत नाहीत तर क्रयवस्तूभ्रमामुळे ते वस्तूवस्तूंमधील संबंध अशा स्वरूपात अवतरतात. माणसे दिसतात ती फक्त पार्श्वभूमीमध्ये, या वस्तूंचे मालक म्हणून. संबंध मात्र वस्तूवस्तूंमध्ये असतात असेच पुढे येते. मानवी उत्पादनसंबंध हे वस्तूंमधील संबंध अशा रीतीने पुढे येतात म्हणून मार्क्स म्हणतो की मानवी संबंधांचे वस्तुकरण होते. (बगाडेंनी वस्तुभवन असा शब्द वापरला आहे.) सोन्याचे नाणे, कागदाचा तुकडा, किंवा विनिमयमूल्य म्हणून वापरलेली एखादी वस्तू या निर्जीव वस्तू मानवी संबंधांचे रूप घेतात.

प्रत्येक पिळवणूक-व्यवस्थेला पिळवणुकीबद्दल भ्रम निर्माण करायची गरज असते. या गरजा सरंजामशाही व भांडवलशाहीमध्ये वेगवेगळ्या प्रकारे भागवल्या जातात कारण दोघांच्या उत्पादनसंबंधांमध्ये एक मूलभूत फरक असतो. भांडवलशाहीत मजुराकडे कोणतीच उत्पादन-साधने नसल्यामुळे जगण्यासाठी त्याने भांडवलदाराकडे 'आपणहून', स्वखुशीने जाणे, आर्थिक व्यवहारातील त्याचा अधिकार मान्य करणे याशिवाय त्याला गत्यंतर नसते. सरंजामशाहीत श्रमिकांच्या हातात उत्पादनसाधनांची

**बीड**
प्रतिनिधी

**विशाल गोरे**
भ्र. ९५४५५२८८०२

मालकी असते; कारागिरांकडे त्यांची हत्यारे असतात, शेतकऱ्यांकडे औत इ. असते, जमिनीवर मालकी नसली तरी वहिवाटीने ताबा असतो. (याला एक अपवाद आहे – भारतातील अतिशूद्र जातींकडे ताबाही नव्हता) उत्पादन-साधनांवर मालकी/ताबा असूनही त्यांनी उत्पादनातील वाटा सरंजामदाराला, राजाला का द्यायचा असा प्रश्न उभा राहतो. पिळवणुकीची व्यवस्था टिकवायची तर या प्रश्नाचे भ्रामक उत्तर पुढे यायची गरज असते. हे भ्रामक उत्तर देण्याचा मार्ग सरंजामशाहीत वेगळा असतो. भांडवलशाहीमध्ये उत्पादन व्यवहारातून फेटिशिझम तयार होतो तसे इथे होत नाही. युरोपमध्ये पोपशाहीमार्फत तर भारतात ब्राह्मणशाहीमार्फत दैवी व्यवस्थेची कल्पना मांडून, त्यात पोपला वा ब्राह्मणांना खास स्थान देऊन हे भ्रामक उत्तर देण्यात आले. हे करण्यासाठी, पोपने, ब्राह्मणांनी स्वतःच्या स्वार्थासाठी भाकडकथा रचल्या आणि देवाच्या नावाने त्या खपवल्या आणि अशाप्रकारे पिळवणूक-व्यवस्थेचे समर्थन निर्माण करून ही धोंड जनतेने गळ्यात मिरवावी अशी भ्रमव्यवस्था निर्माण केली. भारताचे वैशिष्ट्य म्हणजे जातिव्यवस्थेची शिडी. ही शिडी कशी दैवी इच्छेनुसार आहे, रास्त आहे पटवण्याचे काम ब्राह्मणांनी आपला स्वार्थ साधत केले.

भांडवली व सरंजामी समाजातील उत्पादन संबंधातील वर निर्देशिलेला फरक व त्या त्या पिळवणूक व्यवस्थेची भ्रम निर्माण करण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत पाहिली तर लक्षात येईल की सरंजामी समाजात उत्पादनव्यवहारात 'फेटिशिझम' तयार होत नाही तसेच उत्पादनसंबंधांचे वस्तुकरणही होत नाही, मानवी उत्पादनसंबंध हे वस्तूंमधील संबंध आहेत अशा रूपात अवतरत नाहीत. मुळात सरंजामी समाजातील भ्रम हा उत्पादनव्यवहारात नसतो. त्यामुळे उत्पादन व्यवहाराच्या संदर्भात 'फेटिशिझम' व 'मानवी संबंधांचे वस्तुकरण' ही संकल्पना सरंजामी समाजाला लावता येत नाही. बगाडे यांची याबाबत भूमिका स्पष्ट नाही. मार्क्स 'कमॉडिटी फेटिशिझम'चे तत्त्व सरंजामी मध्ययुगाला लागू होत नसल्याचे म्हणतो असे मार्क्सचे म्हणणे त्याचे मत म्हणून ते नोंदवतात. पण पुढच्याच वाक्यात म्हणतात याचा अर्थ मध्ययुगात परात्मीकरणाची प्रक्रिया घडत नाही असे नाही. चुकीच्या ओळखीचा फेटिशिझम मध्ययुगात काम करत नाही असे नव्हे. इथे परात्मीकरण म्हणजे फेटिशिझम असे समीकरण बगाडेंच्या डोक्यात आहे असे दिसते. खरे तर या दोघात एक महत्त्वाचा फरक आहे. परात्मीकरण ही एक सर्वसाधारण प्रक्रिया आहे की जिच्यामध्ये मानवी स्वत्व, सत्व, सर्जनशीलता हे मानवापासून हरपले जाऊन एक स्वतंत्र शक्ती बनते व ही शक्ती उलट मानवावर राज्य करू लागते. धर्म हा एका अर्थाने परात्मीकरणाचे एक रूप आहे. तीच गोष्ट शासनव्यवस्थेची. मानवाचे सत्व पराये होऊन उफराट्या रूपात मानवापुढे उभे ठाकते व मानवावर धर्म, शासनसत्ता या रूपात राज्य करू लागते. फेटिशिझम, वस्तुकरण हे परात्मीकरणाचे विशिष्ट रूप आहे की ज्याच्यात मानवी सर्जनशीलता मानवापासून हरपली जाऊन एखाद्या वस्तूचा, एखाद्या प्रतीकाचा गुणधर्म बनते आणि हे प्रतीक, ही वस्तू मानवावर राज्य करू लागते.

फेटिशिझम, वस्तुकरण व परात्मीकरण यांच्यामधील वरील फरक लक्षात न घेता भारतीय सरंजामी समाजाच्या संदर्भात फेटिशिझम ही संकल्पना वापरताना बगाडे म्हणतात – स्त्री-पुरुष व स्त्री-स्त्री, पुरुष-पुरुष संबंधांची वा लिंगभावाची विषमता, जातीची विषमता, राजकीय क्षेत्रातील विषमता यांची घडवणूक व पुनर्घडवणूक करण्यात शुद्धीचा फेटिशिझम मध्यवर्ती राहिला. निर्जीव वस्तूला मानवी गुण प्राप्त होणे याला मार्क्सने फेटिशिझम म्हटले आहे. शुध्द-अशुद्धता ही काही एखादी वस्तू नव्हती तर सामाजिक वास्तव होते के जिचे ब्राह्मणी भुलभुलैय्यातून समर्थन केले गेले. त्यामुळे तिच्याबद्दल फेटिशिझम ही कल्पना वापरणे हे मार्क्सच्या मांडणीशी सुसंगत नाही. तीच गोष्ट वस्तुकरण/वस्तुभवन या संकल्पनेविषयी आहे. बगाडेंनी मांडले आहे – ''जाती-लिंग भावाच्या अशा साचेबंद आत्मकल्पनांना दृढमूल करण्यातून जात-पितृसत्तेच्या सत्तासंबंधांचे वस्तुभवन होत राहिले होते.'' ''ब्राह्मणी ज्ञानाच्या मुशीत जातीय सत्वकल्पनेवर कोरल्या जात असलेल्या अशा वर्चस्व अंकिततेच्या संबंधाचा निर्वाह करण्यातूनच जातींच्या वस्तुभवनाची प्रक्रिया गतिमान होत असते. मार्क्सने बाजारपेठी समाजात उत्पादनसंबंधांचे वस्तुभवन होते हे स्पष्टपणे दाखवले. भारतीय सरंजामी समाजात सत्तासंबंधांचे, जातींचे वस्तुभवन होते असे बगाडेंनी गृहीत धरले आहे. पण सत्तासंबंध, जातीसंबंध या वस्तुरूपात कसे अवतरतात ते स्पष्ट करून दाखवलेले नाही. खरे तर अशी उलगड करणे शक्य नाही कारण

मुळात सरंजामी समाजात मानवी संबंधांचे वस्तुकरण, फेटिशिझम होत नाही.

'कमॉडिटी फेटिशिझम'' (क्रयवस्तूभ्रम), मानवी संबंधांचे वस्तुकरण हे या मार्क्सचे विश्लेषण वाचल्यावर भांडवली जगात मानवी संबंधांचे झालेले उफराटेपण जसे लक्षात येते तसेच क्रयवस्तूभ्रमामुळे भांडवली पिळवणूक कशी झाकली जाते जसे स्पष्ट होते तसा उलगडा फेटिशिझम, वस्तुकरण या संकल्पना बगाडे यांनी भारतीय सरंजामशाहीच्या संबंधात वापरल्याने या व्यवस्थेच्या कोणत्याच बाबतीत होत नाही. आधीच जड झालेली त्यांची मांडणी आणखी जड होते एवढेच. सैद्धांतिक संकल्पना या वस्तुस्थितीदर्शक हव्या. एक प्रकारची वस्तुस्थिती उलगडण्यासाठी सुयोग्य असलेली संकल्पना दुसऱ्या, वेगळ्या वस्तुस्थितीसाठी वापरणे याला मार्क्स forced abstraction म्हणतो. तसा काहीसा प्रकार बगाडेंनी केला आहे.

भारतातील सरंजामशाहीतील धर्मसत्ता, त्यातील ब्राह्मणशाही हे परात्मीकरणाचे एक ठोस उदाहरण आहे, हे उलगडून दाखवणे आवश्यक आहे. बगाडे यांची मांडणी या दिशेने गेली असती तर बरे झाले असते. ●

---

**(श्रावण देवरे / पान ६२ वरून)**

पटेल-मराठा व तत्सम क्षत्रिय जातींचे खासदार १५० च्यावर आहेत. लोकसभेत सहज ठराव मंजूर होईल. मराठा मोर्च्यांची बाजू घेऊन लेखणी झिजविणारे ढमाले-जाधव उपरोक्त कार्यक्रम हाती घेतील काय? न्यायमूर्ती पी. बी. सावंत, न्यायमूर्ती कोळसे-पाटील, डॉ. बाबा आढाव, कॉ. प्रवीण गायकवाड, कॉ. किशोर ढमाले असे दहा दिग्गज मराठा नेते आझाद मैदानावर उपोषणाला बसलेत तर मराठा मोर्च्याच्या संयोजकांना पुढील मोर्च्याच्या निवेदनात पहिल्या क्रमांकाची मागणी 'नचिअप्पन'ची टाकावी लागेल व मराठा मोर्च्याचे एकूणच प्रतिगामी स्वरूप बदलले जाईल. मग कॉ. किशोर ढमालेंच्या स्वप्नातील बौद्धक्रांतीचे, पत्रीसरकारचे व संयुक्त महाराष्ट्रापासून थेट साम्यवादी क्रांतीपर्यंतचे दरवाजे उघडण्यास सुरुवात होईल! ●

**संदर्भ**

१. माजी आमदार व माजी प्राचार्य सदाशिवराव माळी आज हयात असून त्यांच्यासंदर्भातला हा किस्सा पडताळून पाहिला जाऊ शकतो.
२. कॉ. शरद् पाटील यांचा हा लेख 'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकाच्या १६ ते ३१ जुलै २००४ च्या अंकात प्रकाशित झाला आहे.
३. डॉ. बाबा आढाव, परिवर्तनाचा वाटसरू, १६ ते ३१ डिसेंबर २०१६, पान-३६
४. उच्चजातीयांच्या राजकीय व्यवस्थेत कुठेही जागा मिळत नसलेले समाजघटक असंतुष्ट होऊन जेव्हा पर्याय शोधतात तेव्हा त्यांच्यासमोर भाजप-सेनेचे सापळे लावले जातात, परिणमी हे समाजघटक पुन्हा उच्चजातीयांच्याच कचाट्यात सापडतात व एनकाऊंटर केले जातात.
५. मराठा-प्रवृत्तीचा बिमोड करण्याची जी ऐतिहासिक जबाबदारी काळाच्या रेट्यामुळे अप्रत्यक्षपणे भुजबळ आणि मुंडे यांच्या खांद्यावर आली होती, तिच्या शेवटच्या टप्प्यावर ते आले असतांना त्यांचा एनकाऊंटर होणे हा जातीयुद्धाचा एक अपरिहार्य भाग झाला.
६. डॉ. य. दि. फडके, उक्त, पान-२६१.
७. डॉ. य. दि. फडके, उक्त, पान-२६९.

---

## प्रतिसाद : कज्ञा मोठा घोरंधर

१ जानेवारीचा परिवर्तनाचा वाटसरूचा अंक हातात पडला आणि प्रज्ञा पवार यांचे भाषण एका दमात वाचून काढले. अतिशय मोठा आवाका आणि नेमकी चिकित्सा ही या भाषणाची खास वैशिष्ट्ये वाटली. लेखिकेने स्त्रीमुक्ती चळवळ आणि दलित लेखिका व दलित स्त्री मुक्तिवाद यांच्यातील द्वंद्वही चांगले समजावून घेतलेले दिसते. स्त्रीचळवळीने कायद्याची चिकित्सा करण्याची गरज ओळखली आहे आणि केवळ बाबासाहेबांनी घटना लिहिली म्हणून सर्व कायदे प्रमाण मानण्याची प्रथा दलित चळवळीने आणि विशेषत: दलित स्त्रीचळवळीने पुढे रेटून नेणे चुकीचे आहे हे विश्लेषण मला अतिशय पटले. आपले विचार ठोसपणे आणि परखडपणे मांडणे हे या लेखिकेचे वैशिष्ट्य मला फारच महत्त्वाचे वाटते. अभिनंदन!

–छाया दातार